


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : १९४ वा | बुधवार दि १७ सप्टेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# आरक्षणाचा मुद्दा तापला...

## मुख्यमंत्र्यांच्या भाषणावेळी ओबीसी आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी, कार्यक्रमस्थळी गोंधळ

**वृत्तसंस्था/ छत्रपती संभाजीनगर**

हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनाचा सोहळा आज छत्रपती संभाजीनगर इथं पार पडत आहे. मुख्य शासकीय सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत सिद्धार्थ उद्यानात हा सोहळा सुरू होता. मात्र मुख्यमंत्री फडणवीस हे भाषणासाठी उभे राहिल्यानंतर ओबीसी आंदोलकांनी सभास्थळी गोंधळ घातल्याचं पाहायला मिळालं. सरकारने मराठा आरक्षणासाठी काढलेल्या जीआरमुळे ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याचं सांगत या आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाषण सुरू होताच या कार्यक्रमात उपस्थित असलेले काही ओबीसी आंदोलक अचानक उठले आणि त्यांनी घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे सभास्थळी गोंधळ उडाला होता. त्यानंतर पोलीस कर्मचाऱ्यांनी घोषणाबाजी करणाऱ्या ओबीसी आंदोलकांना बाजूला नेत ताब्यात घेतलं आहे. दरम्यान, मुक्तिसंग्राम दिनानिमित्ताने छत्रपती संभाजीनगरमध्ये विविध संस्था, संघटनातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून गोंधळ सुरू असताना ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली काल अन्न नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांच्या मंत्रालयातील दालनात पार पडली. या बैठकीला पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे, इतर मागास व बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, वनमंत्री गणेश नाईक आणि कृषिमंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित होते. या वेळी सविस्तर चर्चा झाली. दरम्यान, बोगस जात प्रमाणपत्रांना आळा घालण्यासाठी कागदपत्रांची सखोल पडताळणी





करण्याचे निर्देश मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी दिले आहेत. ओबीसी समाजासाठी प्रलंबित असलेला २,९३३ कोटी रुपयांचा निधी १५ दिवसांत वितरित करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

---

# दीपात्रातून शेतकरी, शेतमजुराचा धोकादायी प्रवास!

## पैनगंगा नदीवर पुलवजा बंधारा आवश्यक, मात्र लोकप्रतिनिधींचे लक्ष निवडणूकीवर!

**जनसंचलन/बुलडाणा**

चिखली तालुक्यातील किन्होळा गावाला लागूनच पैनगंगा नदी वाहते. दोन तिन वर्षापासुन नदीचे खोलीकरण झाल्याने गावालगतच नदिपात्र सात आठ फुट खोल झाले आहे व नदिवर काही ठीकाणी बंधारे बांधल्याने नदीपात्रात चार पाच फ ूट पाणी कायम वाहत राहते. त्यामुळे या वाहत्या पाण्यामधून शेतकरी व शेत मजुरांना आपला जीव धोक्यात घालून शेती करावी लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे. परिणामी शेतकरी, शेतमजुराचा प्रवास सुखद व्हावा,अशी मागणी केली जात आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही विविध अडचणी असल्याने शेतीच्या मशागतीची काम वेळेवर होत नाही. त्याचे परिणाम शेती उत्पन्नावर होऊन शेतकरी आर्थीक व मानसीक अडचणीत सापडला आहे. यामुळे ब्रम्हपुरी शिवारातील शेती करने अवघड होऊन बसले आहे. बरेच शेतकरी आपली शेती विक्रीच्या तयारीत आहेत आहेत.परंतु नेहमीच असलेली पूर परिस्थिती यामुळे या भागातील शेती खरेदी करण्यास ग्राहक सुद्धा मिळत नाही. अगोदरच संकटात असलेला बळीराजाला दिलासा देण्यासाठी शासनाने प्राधान्याने स्मशानभूमीलगत पैनगंगा नदिवर पूल वजा बंधारा बांधून दिल्यास किन्होळा गावक-यांची पीण्याच्या पाण्याची,शेती सिंचनाची आणि रस्त्याची समस्या कायमची मिटणार आहे. स्वतंत्र्य प्राप्ती पासून आजपर्यंत असलेला हा महत्वाचा प्रश्न मार्गी लावणे अत्यंत महत्वाचे झाले आहे. मात्र लोकप्रतिनिधी केवळ निवडणूक जवळ आल्यावर आश्वासन देतात परंतु प्रत्यक्षात समस्या कायम राहतात. ब्रम्हपुरी शिवारातील शेतात जाण्यासाठी नदिवरील बंधारे फोडून शेतकरी पाण्यातून



जाण्यासाठी जी धडपड करतात ती धडपड कायमची बंद झाली पाहिजे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्नही कायमचा दूर होईल. लोकप्रतिनीधींनी प्राधान्याने सदर काम पूर्ण करण्याची मागणी शेतकरी महिला, शेत मजूर करीत आहे.

# खेळ आणि भावना!

## संपादकीय लेख

भारत विरुद्ध पाकिस्तान लढत म्हणजे पारंपरिक, कट्टर प्रतिस्पर्ध्यांतील सामना. हा असा सामना रविवारी झाला आणि सोबत त्याची चर्चाही रंगली. यापूर्वीही भारत आणि पाकिस्तान यांनी एकमेकांशी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळण्यावरून वाद झाले. वास्तविक इतर प्रतिस्पर्ध्यांतदेखील अनेक खेळांतील लढती होतात. त्यातही वाद होतात; मात्र त्याची चर्चा फारशी होत नाही. मध्यंतरी आशिया कप हॉकी स्पर्धेत पाकिस्तान खेळणार होते. ही स्पर्धा तर भारतात होती. त्यातील पाकच्या सहभागास मोठ्या प्रमाणावर राजकीय विरोध झाल्याचे दिसले नाही. डेव्हिस कप लढतीसाठी भारताचा टेनिस संघ पाकिस्तानात गेला; पण क्रिकेट संघाला चॅम्पियन्स स्पर्धेसाठी पाकिस्तानात पाठवले गेले नाही. या वर्षाच्या अखेरीस तमिळनाडूत होणाऱ्या वर्ल्ड कप ज्युनियर हॉकीत पाकिस्तान खेळेल, असे संकेत असले तरी त्यासही अजून विरोध झालेला नाही. दोन देशांतील क्रिकेट लढतीतून मिळणारे उत्पन्न सर्वांनाच आकर्षित करते. २०२५च्या चॅम्पियन्स कप स्पर्धेतील भारत-पाक सामन्याचा एकूण टीव्ही प्रतिसाद २६ अब्ज मिनिटांचा होता, तर भारतात २०२३मध्ये झालेल्या वर्ल्ड कप वनडे स्पर्धेचा एकूण प्रतिसाद होता १९.५ अब्ज मिनिटे. पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूरनंतर प्रथमच होत असलेल्या दोन देशांतील पहिल्या क्रिकेट सामन्याला झालेला विरोध तीव्र होता. त्यातच भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने आशिया कप स्पर्धेच्या करंडक अनावरण सोहळ्यात पाकिस्तानचे अंतर्गत सुरक्षामंत्री मोहसीन नक्वी यांच्याशी हस्तांदोलन केले व त्यावरून तो लक्ष्य झाला. वास्तविक ते हस्तांदोलन आशिया क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष या नात्याने होते. या पार्श्वभूमीवर प्रत्येक जण ताकही फुंकूनच पिणार.



म्हणूनच, भारतीय संघव्यवस्थापनाने रविवारच्या सामन्यात नाणेफेकीच्या वेळी; तसेच सामना संपल्यानंतर हस्तांदोलन टाळणे हे अपेक्षितच होते. हस्तांदोलन टाळल्यामुळे भारतीय संघाचे कौतुक होत आहे हे पाहून पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने या सामन्याचे सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना लक्ष्य केले. त्यांनी प्रतिस्पर्धी कर्णधारांना हस्तांदोलन करण्यापासून रोखल्याचा दावा केला. एवढेच नव्हे तर पाकचा कर्णधार सलमान आगा सामन्यानंतरच्या बक्षिस वितरणास अनुपस्थित राहिला. आता या न झालेल्या हस्तांदोलनाचे पडघम आशिया कप स्पर्धेच्या निमित्ताने होत असलेल्या भारत-पाक मालिकेतील दुसऱ्या सामन्यापर्यंत मोठ्या प्रमाणावर वाजत राहणार हीच चिन्हे आहेत.

## वरूणराजाचा रुद्रावतार! २२२ गावे बाधीत!

# दोघांचा मृत्यू ,घरे पडली,५८४९९ हेक्टरवरील पिके उध्वस्त!

**जनसंचलन/बुलढाणा**

सलग दोन दिवसांपासून जोरदार पावसाने जिल्ह्याला झोडपून काढले आहे. अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली असून यंत्रणेच्या प्राथमिक अहवालानुसार २२२ बाधीत गावातील ५८४९९. ७४ हेक्टरवरील पिके उध्वस्त झाली आहे. शेतात पाणी साचल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. देऊळगाव राजा तालुक्यात व मलकापूर येथे घरांच्या भिंती खचल्या,घरांची पडझड झाली. पशुधन वाहून गेले तर शेतातील विहिरी खचल्या आहे. तसेच मेहकर तालुक्यात १५ सप्टेंबर रोजी दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मेहकर तालुक्यातील वडाळी येथील विठ्ठल पांडूरंग जटाके (५१) यांचा शेतात शॉक लागून तर गोमधेर येथील रामदास सखाराम खडक (७०) यांचा शेततळ्यात पडून करुण अंत झाला. विशेष म्हणजे देऊळगाव राजा,मलकापूर, जांभूळधाबा, नरवेल,धरणगाव महसूल मंडळात अतिवृष्टीने मोठे नुकसान झाल्याची



माहिती सुत्रांनी दिली आहे.

**कुठे किती नुकसान ?**

मलकापूर तालुक्यात सर्वाधिक ७८ गावात नुकसान झाले तर त्या पाठोपाठ देऊळगाव राजा तालुक्यात ६४ गावे बाधित झाली आहे.सिंदखेड राजा तालुक्यात ५४ गावे,नांदुरा तालुक्यात १७ गावे,बुलढाणा तालुक्यात पाच गावे तर शेगाव मध्ये चार गावे बाधित झाली असल्याचा प्रशासकीय यंत्रणेचा अहवाल हॅलो बुलढाणा ला प्राप्त झाला आहे.

**वज्रघाताने घर क्षतिग्रस्त, ३ लाखांचे नुकसान!**

विजांनी तांडव केला असून बुलढाणा शहरात विज कोसळून घरांची व विद्यूत उपकरणांची हानी झाल्याची घटना सकाळी ९ वाजता येथील क्रीडा संकुल परिसरात समोर आली. भूषण यंदे यांच्या घरावर विज पडल्याने अनेकांच्या उरात धडकी भरली.या घटनेत सुदैवाने जिवित हानी टळली आहे.परंतू या घटनेत भूषण यंदे यांचे ३ लाखांचे नुकसान झाल्याचा पंचनामा तलाठी राजपूत यांनी केला आहे.

# दिव्यांगांच्या शाळेजवळ कार अपघात; जीवितहानी टळली!

**जनसंचलन/ बुलडाणा**

धाड मार्गावरील दिव्यांग शाळेजवळील वळणावर मंगळवारी (दि. १६) दुपारी दोनच्या सुमारास कारचा अपघात झाला. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही. धाड नाक्याहून बुलढाणा शहराकडे येणारी कार घाट रस्त्यावर दिव्यांग शाळेजवळ पोहोचताच अचानक ब्रेक लागल्याने नियंत्रण सुटले. त्यामुळे कार फिरली आणि रस्त्यालगत असलेल्या नाल्यात उलटली. अपघातात वाहनातील कुणालाही दुखापत झालेली नाही. विशेष म्हणजे, याच परिसरात गेल्या आठवडाभरात तिसऱ्यांदा अपघाताची घटना घडली. त्यामुळे या पट्ट्यात अपघात टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार
हॅलो बुलडाणा
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भीड जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलढाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आपण राष्ट्रवादी काँग्रेस, आपल्या मागे विचारधारा...

# जिथे पुतण्याने रणशिंग फुंकले काकाने तिथेच खिंडीत पकडले



**पुणे :** ३१ जानेवारीपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, असे आदेश सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयोगाला दिले आहेत. आधी ३१ ऑक्टोबरपर्यंत निवडणुका घेण्यासंदर्भात आदेश दिले होते. त्यानंतर आता चार महिन्यांची मुदतवाढ दिल्यानंतर सगळ्याच राजकीय पक्षांनी निवडणुकीच्या तयारीसाठी कंबर कसली आहे. यामध्ये पुणे महानगरपालिकेच्या येऊ घातलेल्या निवडणुकीसाठी पवार काका पुतण्यामध्ये जोरदार टशन पाहायला मिळत आहे. गेल्या आठवड्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याची उपमुख्यमंत्री अजित पवार पुण्यातील हडपसर विधानसभा मतदारसंघांमध्ये आपल्या जनसंवाद कार्यक्रमाला सुरुवात केली तर राष्ट्रवादी मिलन या राष्ट्रवादीच्या कार्यक्रला सुद्धा हडपसर विधानसभा मतदारसंघातून अजित पवार यांनी सुरुवात केली आहे. आता अजित पवार यांनी ज्या हडपसर विधानसभा मतदारसंघात कार्यक्रमांना सुरुवात केली. त्याच विधानसभा मतदारसंघात येऊन शरद पवार यांनी अजित पवारांना खिंडीत पकडले आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटी नंतर खरा पक्ष कुणाचा हा वाद आणखी देखील कार्यकर्त्यांमध्ये पाहायला मिळतो. याच अनुषंगाने आज शरद पवार यांनी अजित पवारांना नावं न घेता राष्ट्रवादीच्या विचारधारेची आठवण करून देत टोला लगावला आहे. पुण्यातील वानवडी परिसरात आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची कार्यकारिणी बैठक आणि मेळावा पार पडला आहे. या मेळाव्यात शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी शरद पवारांनी थेट विचारधारेचा मुद्दा छेडून अजित पवारांना खिंडीत पकडलं आहे. आपण गांधी नेहरूचे विचार मानतो. उद्या निवडणुका होतील त्यावेळेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून आपण मतदारांच्या समोर जाणार आहोत. आपण काँग्रेसच्या नावाने जातो राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मागे विचारधारा आहे. ती विचारधारा गांधी नेहरू आझाद यांची विचारधारा आहे. ही विचारधारा आपल्याला मजबूत करायची आहे. पुणे शहरात काँग्रेसी विचारांचे लोक अधिक आहेत, असं शरद पवार म्हणाले आहेत. त्यामुळे भारतीय जनता पक्षासोबत महायुतीमध्ये सहभागी असणाऱ्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पक्षाची मूळ विचारधारा सोडली आहे का? हा वाद शरद पवार यांच्या वक्तव्याने पुन्हा नव्याने उफळण्याची शक्यता आहे.दरम्यान, काही पक्ष देश पातळीवर आपल्याला सहकार्य करतात. काही पक्ष राज्यामध्ये सहकार्य करतात, काही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा विचार करत आहेत. यासंबंधीचा निकाल पक्षाचे अध्यक्ष आणि त्यांचे सहकारी लवकरच घेतील आणि अन्य मित्र पक्ष यांच्याशी सुसंवाद साधून त्यांच्यासोबत जायचं की नाही? गेलो तर कार्यक्रम काय असेल, किती जागा मिळतील, त्या कोणत्या असतील? या सगळ्यांचा निर्णय आपले अध्यक्ष आणि त्यांचे सहकारी हे तुम्हा लोकांच्या विश्वासाने घेतील आणि तसे आपण निवडणुकीला सामोरे जाऊयात, असं देखील शरद पवार म्हणाले आहेत.

# बँकेचं थकलेलं कर्ज, शेतातून उत्पन्न नाही; विवंचनेतून दाम्पत्यानं शेतात कीटकनाशक औषध घेतलं;

## नवऱ्याचा अंत, बायकोची मृत्यूशी झुंज....



**नागपूर :** शेतात घाम गाळूनही पोटापुरते धान्य न मिळणारे दिवस, बँकेचं थकलेलं कर्ज, हातउसने घेतलेले पैसे आणि शेतीतील अपयश, या सर्व ओझ्याने विव्हळलेल्या एका वृद्ध शेतकरी दाम्पत्याने अखेर जगण्याची आशा सोडली. कर्ज फेडता येत नाही, घर चालत नाही, पिकांची अवस्था दयनीय. या विवंचनेतून त्यांनी राहत्या घरी विष प्राशन केलं . यात पतीचा जागीच मृत्यू झाला, तर पत्नी मृत्यूशी झुंज देत आहे. ही हृदय पिळवटून घटना नरखेड तालुक्यातील आहे.ही घटना नरखेड तालुक्यातील कुंभारपेठ, वॉर्ड क्रमांक १२ येथे काल रविवारी दुपारी घडली. अल्पभूधारक शेतकरी नामदेव संतोष बरडे (वय ७०) यांच्याकडे ब्राह्मणी शिवारात अवघी दीड एकर शेती होती. पण वारंवार पिकावर येणारे नैसर्गिक संकट, अतिवृष्टी आणि अपुरे उत्पन्न यामुळे घरखर्च भागवणेच कठीण झालं होतं. शेतातून हातात काहीच उरत नसल्याने पत्नी लता नामदेव बरडे (वय ६२) यांनी दुसऱ्याच्या शेतात मजुरी करून संसाराचा गाडा पुढे नेण्याचा प्रयत्न केला. मृत नामदेव बरडे आणि प्रकृती चिंताजनक असलेल्या लता बरडे यांनी रविवारी सकाळी शेतातील पिकांची पाहणी केली. पिकांची दयनीय अवस्था पाहून त्यांचं मन खचलं. यानंतर घरी परतल्यावर दुपारी दोघांनीही १२ ते २ वाजताच्या सुमारास मोनोक्रोटोफॉस हे कीटकनाशक प्राशन केलं. शेजाऱ्यांना ही बाब कळताच त्यांना तातडीने नरखेड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं.मात्र, डॉक्टरांनी नामदेव बरडे यांना मृत घोषित केलं तर पत्नी लता यांची प्रकृती गंभीर असल्यानं त्यांना नागपूर येथील मेयो रुग्णालयात हलविण्यात आलं आहे. बरडे दाम्पत्यावर बँकेचं कर्ज, बचत गटाचे कर्ज तसेच हातउसने घेतलेली रक्कम अशा अनेक देण्यांची सावली होती. शेतीतून न मिळणाऱ्या उत्पन्नामुळे कर्ज फेडणं अशक्य झालं होतं. हे पैसे परत कसे करणार? या प्रश्नाने ते अस्वस्थ झाले होते. अखेरीस याच विवंचनेतून त्यांनी हा टोकाचा निर्णय घेतला. या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे.ही घटना केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून ग्रामीण अर्थकारणातील अस्थिरता आणि शेतकऱ्यांच्या वाढत्या ओझ्याचे प्रतिक आहे. कमी जमिनीवर कसणारे अल्पभूधारक शेतकरी हवामानातील बदल, बाजारभावातील चढ-उतार आणि कर्जाच्या वाढत्या दडपणात सापडून जात आहेत. सरकारने कर्जमाफीसह विविध योजना जाहीर केल्या असल्या तरी त्या खऱ्या अर्थाने कितपत पोहोचतात, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.बरडे दाम्पत्याच्या या घटनेने नरखेड परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, गावकऱ्यांतून ङ्खशेतकऱ्यांना जगण्यासारख्या सुविधा कधी मिळणार?ङ्खङ्ख हा प्रश्न पुन्हा एकदा ऐकू येत आहे. आत्महत्येची ही मालिका थांबवण्यासाठी केवळ आर्थिक मदत नव्हे, तर मानसिक आधार आणि स्थिर शेती धोरणांची गरज आहे.

# मुंबईत मी कामासाठी आले, शेवटी मला ओढ गावाचीच...

## मायानगरीत राहण्याविषयी काय म्हणाली रिंकू राजगुरू?

**मुंबई:** अभिनेत्री रिंकू राजगुरूने कमी वयातच मराठीसह हिंदीत उल्लेखनीय काम केले आहे. सैराट, झिम्मा २, २०० हल्ला हो, कागर अशा विविध धाटणीच्या सिनेमात ती झळकली. प्रेक्षकांची लाडकी आर्ची म्हणून लोकप्रिय असणाऱ्या या अभिनेत्रीने वेब विश्वातही नाव कमावले आहे. अलिकडेच तिचा बेटर हाफची लव्ह स्टोरी हा सिनेमा रीलिज झाला, तर लवकरच ती पुन्हा एकदा साडे माडे तीनमध्ये झळकणार आहे. अशा व्यग्र वेळापत्रकामुळे रिंकू काही महिन्यांपासून मुंबईतच वास्तव्यास आहे. मुळची अकलूजची असणारी रिंकू मुंबईत कशी स्थिरावली, याविषयी अलिकडेच तिने एका



मुलाखतीत भाष्य केले.मुंबईतील आयुष्य कसं एन्जॉय करतेयंस, असा प्रश्न विचारल्यानंतर रिंकू म्हणाली की, छान आहे, वेगळं आहे. मुंबईत मी कामासाठी आले, शेवटी मला ओढ गावाचीच आहे. मला तिथे राहायला जास्त आवडतं, कारण माझे कुटुंब तिथे आहे. कामासाठी राहण्याचा सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे मुंबई आहे, इथे बऱ्याच सोयीसुविधा आहेत. तुम्हाला बऱ्याच नवीन गोष्टी शिकायला मिळतात, एक्सप्लोअर करायला मिळतं. लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीत ती बोलत होतीरिंकूने पुढे असे म्हटले की, मुंबई मस्त आहे! नवीन लोकांना मुंबई आपलंसं करुन घेते, हे जे म्हणतात ते खरंच आहे. मुंबईत भटकंती करण्याविषयी रिंकूने म्हटले की, मी काम ते घर, काम ते घर, एवढंच करणारी मुलगी आहे. मी खूप कमी फिरते. मी सिद्धीविनायक मंदिरात जाते. कारण माहिती नाही, पण मला ते मंदिर आवडतं. मुंबईत माझं कुटुंब नाही, त्यामुळे मला जेव्हा काही काम नसेल, करमत नसेल, एकटं वाटत असेल... तर मी सिद्धीविनायक मंदिरात जाऊन बसते. मला मजा येते.रिंकूने म्हटले की, तिचे आई-बाबा दोघेही शिक्षक असल्याने त्यांना वारंवार मुंबईत येता येत नाही. त्यांच्या सुट्टीच्या दिवशी ते येतात किंवा तीच थेट गावी पोहोचते. रिंकून असेही म्हटले की, तिचे मुंबईत असे कोणी मित्रमैत्रिणीही नाही, तसेच तिने इंडस्ट्रीत खूप लवकर काम करण्यास सुरुवात केल्याने तसेही तिचे मित्रमंडळी कमी आहेत. त्यामुळे तिच्याकडे मोकळा वेळ असेल, तर आईशी व्हिडिओ कॉल, वाचन या गोष्टींमध्येच वेळ घालवते, असे अभिनेत्रीने म्हटले.

# श्वेता तिवारीचा साडीमधील लूक पाहून थक्क व्हा, चाहते म्हणतात ४४ वर्षी देखील अप्सरा दिसतेस

टीव्ही अभिनेत्री श्वेता तिवारीने नुकतीच एका खास प्रसंगी जी साडी घातली, ती पाहून चाहत्यांचे लक्ष थेट तिकडे गेले. या साडीत गोल्डन बॉर्डर आणि रंगीबेरंगी फुलांच्या नक्षीदार एम्ब्रॉयडरी वर्कमुळे तिचा लूक अत्यंत आकर्षक आणि एलिगंट दिसत होता. श्वेताने जुळणारा डायमंड-रुबी नेकलेस सेट आणि कानातील इयररिंग्स घालून आपल्या लूकला अधिक उठावदार बनवले. हलका मेकअप, न्यूड शेड लिपस्टिक आणि थोडासा ब्लश तिच्या नैसर्गिक सौंदर्याला सुंदर उजाळा देत होते. सरळ सोडलेले केस आणि साधी स्माईल यामुळे तिचा व्यक्तिमत्वात एक वेगळीच शोभा आली होती.चाहत्यांनी तिच्या या लूकचे कौतुक केले आणि ४४ वर्षांनंतरही ती अप्सरा सारखी दिसते, अशी प्रतिक्रिया दिली. श्वेताचा हा लूक हे दाखवतो की साधेपणा आणि एलिगन्स एकत्र येऊन किती प्रभावी दिसू शकतात.

**श्वेता तिवारीचा लुक**

श्वेता तिवारीचा हा लूक अत्यंत मोहक आहे. वाइन कलरच्या साडीत तिने मल्टीकलर फ्लोरल एम्ब्रॉयडरी आणि गोल्डन बॉर्डर तिच्या सौंदर्यात भर घालत आहे. हलका मेकअप, ओपन हेअरस्टाईल आणि आकर्षक स्माईलमुळे तिचा लूक अधिकच खुलून दिसतो. गळ्यातील स्टायलिश नेकलेस आणि ईअरिंग्स तिच्या पारंपरिक वेशभूषेला आधुनिक टच देतात. हातात घातलेलं स्मार्टवॉच तिच्या लूकला ट्रेंडी आणि एलिगंट असा फिनिश देतं. संपूर्ण लूककडे पाहिलं तर तो पारंपरिकतेसोबतच आधुनिकतेचं सुंदर मिश्रण वाटतो.

**श्वेता तिवारीचे ब्लाऊज डिझाईन**

श्वेता तिवारीने या लूकसाठी मॅचिंग वाइन कलरचा ब्लाऊज परिधान केला आहे. या ब्लाऊजवरही साडीप्रमाणेच फ्लोरल एम्ब्रॉयडरीचे नक्षीकाम केलेले आहे, ज्यामुळे साडी आणि ब्लाऊजचा कॉम्बिनेशन अधिक उठून दिसतो. हाफ स्लीव्ह्ज डिझाइन आणि परफेक्ट फिटमुळे तिचा लूक एलिगंट आणि ग्रेसफुल दिसतो. पारंपरिक साडीला हा ब्लाऊज आधुनिक टच देत असून, तिच्या व्यक्तिमत्त्वाला अधिकच शोभून दिसतो.

**श्वेता तिवारीची हेअरस्टाईल**

श्वेता तिवारीची हेअरस्टाईल तिच्या लूकला एक साधेपणा आणि एलिगन्स देते. तिने केस मोकळे ठेवले असून, त्यांना नैसर्गिक स्ट्रेट स्टाईलमध्ये साइड पार्टिंग केले आहे. हलकासा शाइन आणि स्मूद टेक्स्चरमुळे केस खूपच सॉफ्ट आणि ग्लॉसी दिसतात. ही सिंपल पण क्लासी हेअरस्टाईल तिच्या वाइन कलर साडी आणि दागिन्यांशी परफेक्टली मॅच होत असून तिच्या व्यक्तिमत्त्वात एक वेगळाच चार्म भरते.श्वेता तिवारीच्या या पारंपरिक साडीच्या लूकमध्ये हातात तिने घातलेलं स्मार्टवॉच विशेष लक्ष वेधून घेतं. पारंपरिक वाइन कलर साडी, एम्ब्रॉयडरी डिटेल्स आणि दागिन्यांबरोबर हे मॉडर्न वॉच एक अनोखा कॉन्ट्रास्ट तयार करतं. साधारणपणे साडीसोबत घड्याळ कमी दिसतं, पण श्वेताने ते आत्मविश्वासाने कॅरी करून पारंपरिकतेत आधुनिकतेचा सुंदर टच दिला आहे. त्यामुळे तिचा संपूर्ण लूक अजूनच ट्रेंडी आणि स्टायलिश भासतो.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बाळासाहेब ठाकरेच ब्रॅण्ड, तुम्ही नाही! भाजपच्या मेळाव्यात फडणवीसांची ठाकरे बंधूंवर टीका...

**मुंबई :** नुसते नाव असल्याने कुणी ब्रॅण्ड होत नाही. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हा ब्रॅण्ड होता. तुम्ही ब्रॅण्ड नाहीत, अशा शब्दांत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले. बेस्टच्या निवडणुकीत काहीजण म्हणाले, आमचा ब्रॅण्ड आहे. परंतु आमच्या शंशाक राव, प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड यांनी या ब्रॅण्डचा बॅण्ड वाजविला, बॅंड बाजा वाजला, अशा शब्दांत त्यांनी ठाकरे बंधूंच्या युतीची खिल्ली उडवली. मुंबई भाजपतर्फे वरळी डोम येथे मंगळवारी विजयी संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.





यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, नवनियुक्त मुंबई अध्यक्ष अमित साटम, मंत्री आशीष शेलार, मंगलप्रभात लोढा यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.आमच्या पक्षात अमित साटमसारखा सामान्य कार्यकर्ता अध्यक्ष होतो. आमच्याकडे चहा विकणारा जागतिक ब्रँड झाला. नरेंद्र मोदी नावाचा जगातील सर्वात मोठा ब्रँड आमच्याकडे आहेफ, असे गौरवाद्गारही त्यांनी काढलेते पुढे म्हणाले की, मुंबईच्या गिरणगावात राहणारा मराठी माणूस आज वसई विरार, कर्जतला फेकला गेला आहे. आम्ही मात्र बीडीडी चाळीचा पुनर्विकास केला. म्हाडाच्या माध्यमातून मराठी माणसाला हक्काचे घर देण्याचा आमचा प्रयत्न आहे. ज्यांच्या हाती मुंबईची सत्ता होती त्यांना स्वप्नही बघता येत नव्हते आणि लोकांचे स्वप्नही पूर्ण करता येत नव्हते,

अशा शब्दांत त्यांनी विरोधकांवर हल्लाबोल चढविला.आम्ही धारावीच्या दहा लाख लोकांना घर देत आहोत. या सर्व लोकांना धारावीतच घर देण्यात येणार आहे. प्रत्येकाला घर देणारा आमचा हा प्रकल्प आहे, असे सांगत त्यांनी आमचे सरकार मुंबईच्या विकासासाठी प्रयत्न करत असल्याचे ते म्हणाले. मुंबईतील सगळ्यात मोठ्या बीडीडी चाळीचा बिल्डरच्या दबावाखाली तुम्ही विकास होऊ दिला नाही. आज या देवाभाऊने या चाळी विकसित करून दाखवले, असेही ते म्हणाले.मागील महापालिका निवडणुकीनंतर भाजपचा महापौर सहज करता आला असता. आमच्या अवघ्या दोन जागा कमी होत्या. आम्ही सारी जुळवाजुळवही केली होती. मात्र, मैत्रीच्या नात्यासाठी हे पद उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. उद्धव ठाकरे नर्व्हस आणि नाराज असून महापौरपद मिळावे म्हणून मिलिंद नार्वेकर आणि एकनाथ शिंदे यांनी तेव्हा फोन केला होता, असा गौप्यस्फोटही फडणवीसांनी केला. त्यानंतरचा अनुभव म्हणजे अच्छा सिला दिया तुने... असा होता, असेही ते म्हणाले.

---

## सततचे अपघात अन् तांत्रिक बिघाड..., मोनोरेल सेवा बंद करण्याचा मोठा निर्णय; कोणत्या मार्गावर ब्रेक? जाणून घ्या

**मुंबई :** पावसाच्या माऱ्याने मोनोरेलमध्ये सातत्याने तांत्रिक बिघाड होत असल्याचे समोर आले. परिणामी मुंबईत झालेल्या दोन अपघातांमुळे एमएमआरडीए प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. मोनोरेल तात्पुरता बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. चेंबूर ते सात रस्ता अशी मोनोरेल सध्या चालवण्यात येत होती. ही सेवा २० सप्टेंबरपासून बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. मुंबईतील मोनोरेल सेवेमध्ये अनेकदा अडथळे निर्माण झाले आहेत. नुकत्याच १९ ऑगस्टला झालेल्या मुसळधार पावसानंतर गंभीर दुर्घटना घडली. सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास म्हैसूर कॉलनीजवळ मोनोरेल थांबली आणि तब्बल ५८२ हून अधिक प्रवासी दोन ते तीन तास अडकून पडले. अखेरीस अग्निशमन दलाच्या पथकाने धाडसी प्रयत्न करून प्रवाशांची सुरक्षित सुटका केली. यानंतर दोन दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे आचार्य अत्रे नगर स्थानकातही आणखी एक मोनो अडकून पडली, ज्यामध्ये जवळपास २०० प्रवासी अडकले. त्यांचीही सुखरूपपणे सुटका करण्यात आली.मोनोरेल ही देशातील एकमेव प्रणाली असून ती संत गाडगे महाराज चौक ते चेंबूर या १९.७४ किलोमीटरच्या मार्गावर धावत असते. मात्र गेल्या काही वर्षांत वारंवार होणारे अपघात आणि बिघाडांमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर मोनोरेल सेवा थांबवून भविष्यातील सुरक्षित आणि सुरळीत संचालनासाठी तांत्रिक सुधारणा सुरू करण्यात आल्या आहेत.या सुधारणा काळात मोनोरेल गाड्यांची डागडुजी केली जाणार असून नव्या गाड्यांचे परिचलन अधिक सुरक्षितपणे होण्यासाठी



सिग्नलिंग प्रणालीतही सुधारणा केली जात आहे. विशेष म्हणजे, हैदराबादमध्ये विकसित करण्यात आलेली कम्युनिकेशन बेस्ड ट्रेन कंट्रोल सिस्टीम प्रथमच या मार्गावर बसवली जाणार आहे.तसेच, ३२ ठिकाणी इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणाली बसवली गेली असून त्यांची चाचणी सध्या सुरू आहे. प्रवासी सुविधा वाढवण्यासाठी २६० वायफाय ॲक्सेस पॉइंट, ५०० टॅग्स, ९० ट्रेन डिटेक्शन सिस्टीम आणि मल्टिपल यंत्रणा आधीच कार्यान्वित करण्यात आली आहे. याशिवाय वेसाईड सिग्नलिंगची कामे पूर्ण झाली असून एकात्मिक तपासणी टप्प्यावर आली आहेत.

मुंबईकरांसाठी मोनोरेल हा महत्वाचा वाहतुकीचा पर्याय ठरू शकतो, मात्र त्यासाठी सुरक्षितता आणि विश्वासार्हता अत्यावश्यक आहे. वारंवार होणाऱ्या बिघाडानंतर आता घेतली जाणारी ही पावले प्रवाशांना अधिक सुरक्षित, निर्धोक आणि वेळेवर सेवा देण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहेत

## जुन्या वादातून मित्राने जीवलग मित्राला संपवलं, वडिलांच्या श्राद्धाच्या दिवशी अभिषेकचा मृत्यू; आईचा मन हेलावणारा आक्रोश...

**नागपूर :** मैत्री तुटली की ती वैरातही बदलू शकते, याचं प्रत्यंतर नागपुरातील वाठोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घटनेत आलं. सूरजनगरमध्ये राहणाऱ्या २५ वर्षीय अभिषेक राजकुमार पिंपळीकरची हत्या त्याच्याच जुन्या मित्राने केल्यानं परिसरात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे ही घटना अभिषेकच्या वडिलांच्या श्राद्धाच्या दिवशीच घडल्याने दु:ख अधिकच तीव्र झालं आहे.अभिषेक लहानपणापासूनच साध्या परिस्थितीत वाढला. त्याची आई मीना पिंपळीकर स्वयंपाकाचं काम करून संसार चालवत होती, तर अभिषेकने खासगी वाहन चालवून घराची जबाबदारी उचलली होती. काही वर्षांपूर्वी तो आणि आरोपी प्रकाश गायकवाड हे दोघे मिळून कचरा वेचण्याचं काम करायचे. मात्र, अभिषेकला कचरा वाहनावर चालकाची नोकरी मिळाल्यानंतर त्याने हळूहळू प्रकाशपासून अंतर ठेवलं आणि इथूनच दोघांमध्ये मतभेद सुरू झाले.रविवारी वडिलांचं श्राद्ध आटोपल्यानंतर अभिषेक सायंकाळी बाहेर गेला होता. त्यानंतर त्याला प्रकाश भेटला त्यात त्यांच्यात वाद झाला आणि प्रकाशने अभिषेकवर चाकूने वार करून गंभीर जखमी केलं. या हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला, रात्री साडेनऊच्या सुमारास तो सूरजनगरमधीलच रस्त्यावर गंभीर जखमी अवस्थेत पडलेला आढळला. शेजाऱ्यांच्या मदतीने त्याला रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र, चाकूच्या हल्ल्यामुळे झालेल्या प्रचंड रक्तस्त्रावाने त्याचा मृत्यू झाला.या घटनेनंतर आई मीना पिंपळीकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी प्रकाश गायकवाडला पोलिसांनी अटक केली. चौकशीत प्रकाशने जुना वादच हत्येचं कारण असल्याचं सांगितले. त्याचा दावा आहे की, अभिषेक मला मारून टाकेल, अशी भीती होती. म्हणून मी त्याच्यावर आधीच हल्ला केला, असं आरोपी प्रकाशने सांगितलं.या संपूर्ण घटनेमुळे सूरजनगर परिसरात शोककळा पसरली आहे. अभिषेकच्या वडिलांचं श्राद्ध आणि त्याच दिवशी मुलाची हत्या या दुहेरी आघातानं आई मीना हादरल्या आहेत. या हत्येतून मैत्रीतील भांडण किती घातक ठरू शकतं, याचा धडा मिळतो. वाठोडा पोलिस पुढील तपासात आरोपीची मानसिकता, जुने व्यवहार आणि वैयक्तिक राग यामागची खरी पार्श्वभूमी शोधत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# देवेंद्र फडणवीसांचं १०० रुपयांचं चॅलेंज, राऊतांवरही घणाघात, म्हणाले, काही उचके रोज सकाळी उठून...

**मुंबई :** भाजपच्या विजय संकल्प मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली. यावेळी त्यांनी खासदार संजय राऊत यांच्यावरही नाव न घेता निशाणा साधला. काही उचके रोज सकाळी उठून मोदींना प्रश्न विचारतात, पण अशा उचक्यांना उत्तर हे मुंबईच्या जनतेने हे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत दिलं आणि मुंबई कुणाची याचं उत्तर सातत्याने २०१४, २०१९ आणि २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत मुंबईकरांनी दिलं, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुंबई ही भाजपची, मुंबई ही महायुतीची, मुंबई ही उपमुख्यमंत्री




एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची, असं देवेंद्र फडणवीस ठासून म्हणाले. तुम्ही ह्यांची भाषण काढा. मी तर तुम्हाला १०० रुपये द्यायला तयार आहे. तुम्ही १० भाषणं काढा आणि विकासावर एक वाक्य काढा. मुंबईकरांच्या जीवनात परिवर्तन आणण्याकरता विकासाच्या व्हिजनचं एक वाक्य दाखवा आणि माझ्याकडून शंभर रुपये घेऊन जा, अशी ऑफर देवेंद्र फडणवीस यांनी दिली.ते विकासावर बोलतच नाहीत. बोलूही शकत नाहीत. कारण गिरणगावातला मराठी माणूस हद्दपार कुणी केला? हा प्रश्न त्यांच्याकडे नाहीय. या दक्षिण मुंबईतील मराठी माणूस वसई विरार, कर्जतला गेला. याचं दोषी कोण आहे? याचं उत्तर ते देऊ शकले नाहीत. पण याचवेळी मुंबईतील सर्वात मोठ्या बीडीडी चाळीत राहणाऱ्या मराठी माणसावर संकट होतं, इतके वर्ष बिल्डरांच्या दबावाखाली बीडीडी चाळीला विकसित होऊ दिलं नाही. आम्ही विकसित करुन दाखवलं. या देवाभाऊने विकसित करुन दाखवलं, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.आज बीडीडी चाळीचा प्रकल्प संपूर्ण आशियातला सर्वात मोठा अर्बन रिनिवलचा प्रकल्प आहे. ज्याठिकाणी १२० फुटात राहणारा माझा मराठी माणूस ५४० फुटाच्या घरात राहायला गेला. अभ्यूदयमध्ये राहणाऱ्या मराठी माणसाचंदेखील काम आम्ही करत आहोत. मुंबईकरांना परवडेल असं घर देण्याचं प्रयत्न आम्ही करतोय. माझा सवाल आहे, यातील एक तरी गोष्ट तुम्ही करु शकला आहात का? असा प्रश्न माझा विरोधकांना आहे. अरे वर्षानुवर्षे तुम्ही मुंबईत सत्ता हातात ठेवली, या मुंबईची काय अवस्था केली?, असा सवाल फडणवीसांनी केला.

मुंबईला सातत्याने मागे ठेवण्याचं काम झालं. मुंबईच्या जीवावर बंगळुरु, हैदराबाद मोठं झालं. आयटी कॅपिटल म्हणून ते मिरवायला लागेल. पण देशाचं स्टार्टअप कॅपिटल बंगळुरु नव्हे तर मुंबई करुन दाखवलं, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# प्रेमाच्या जाळ्यात ओढलं, प्रायव्हेट पार्टला स्टॅप्लरच्या पिना मारल्या, सुया टोचल्या, हनीट्रॅपचं भयानक प्रकरण...

**तिरुवनंतपुरम :** गुन्हेगारीच्या घटना या सुन्न करणाऱ्या असतात. काही गुन्हेगार इतक्या विकृत आणि अमानुषपणाचं कृत्य करतात की ते इतकं निर्घृणपणे कसं वागू शकतात? असा प्रश्न आपल्याला सतावू शकतो. केरळमध्ये असाच एक प्रकार समोर आला आहे. केरळच्या पथानामथिट्टा जिल्ह्यातून एक अमानवीय घटना समोर आली आहे. एका पती-पत्नीने कथितरित्या दोन मुलांना प्रेमाच्या जाळ्यात अडकवलं. त्यांना गोड बोलून घरी बोलावलं. यानंतर त्यांच्यावर अतिशय क्रूर कृत्य केलं. या दाम्पत्याने पीडित मुलांवर प्रचंड अत्याचार केले. त्यांना मारहाण केली. पीडित मुलांसोबत एकाचवेळी हा क्रूरपणा करण्यात आला नाही. तर दोन वेगवेगळ्या दिवशी हा क्रूरपणा करण्यात आला. या घटनेमुळे संपूर्ण देश हादरला आहे. पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. आरोपी पती-पत्नीला अटक करण्यात आली आहे. पोलीस घटनेचा सखोल तपास करत आहेत. आरोपी मनोरुग्ण असल्याचा पोलिसांना संशय असल्याची देखील माहिती समोर येत आहे. पोलीस तपासात काय-काय माहिती समोर येते? ते पाहणं महत्त्वाचं आहे.या घटनेतील आरोपी पतीचं नाव जयेश असं आहे. तर पत्नीचं नाव रश्मी असं आहे. ते पथानामथिट्टा येथील रहिवासी आहेत. आरोपी रश्मी हिने दोन्ही तरुणांना प्रेम आणि शारीरिक संबंधांचं आमिष देत आपल्या घरी बोलावलं होतं. त्यानंतर दोन्ही पीडित तरुणांना वेगवेगळ्या तारखेला आपल्या घरी बोलवत त्यांच्यांवर क्रूर अत्याचार केले.या प्रकरणातील पहिली घटना ही १ सप्टेंबरच्या दिवशी घडली होती. अलप्पुझा इथे राहणाऱ्या तरुणाला रश्मी आणि तिच्या पतीने त्याला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं होतं. आरोपी दाम्पत्याने तरुणाला गोड बोलून घरी बोलावलं आणि नंतर त्याच्यावर अमानुष अत्याचार केले. आरोपींनी तरुणासोबत अश्लील कृत्य केलं. त्याचे व्हिडीओ बनवले. त्यानंतर तरुणाला बांधून त्याच्यावर मिरचीपूड फेकली.आरोपींची क्रूरता इथेच संपली नाही तर त्यांनी तरुणाच्या गुप्तांगाला तब्बल २६ स्टॅप्लरच्या पिना मारल्या. तसेच तरुणाची निखं काढण्याचं संतापजनक कृत्यदेखील केलं. आरोपींनी तरुणाला अमानुषपणे मारहाण केल्यानंतर त्याला एका रस्त्याच्या कडेला फेकून दिलं. तरुणाचा आक्रोश पाहून तिथल्या काही स्थानिकांचं त्याच्याकडे लक्ष गेलं. त्यांनी तातडीने त्याला रुग्णालयात नेलं.





पीडित तरुणाने आपल्यासोबत घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. रश्मीने आपल्यावर सर्वाधिक अत्याचार केल्याचं तरुणाने सांगितलं. रश्मीने तरुणाच्या शरीरावर स्टॅप्लरच्या पिना आणि सुया खुपसल्या. तर जयेश याने मारहाण केली आणि जखम झालेल्या ठिकाणी मिरचीपूड टाकली, अशी आपबिती तरुणाने पोलिसांना सांगितली. या अमानुष कृत्यात पीडित तरुणाच्या डोळ्यांची दृष्टी कमी झाली, असा दावा केला जातोय. तसेच मारहाणीमुळे तरुणाला अनेक ठिकाणी फ्रॅक्चर झाले आहे, असाही आरोप करण्यात आले आहेत. आरोपी दाम्पत्याने आणखी एका तरुणासोबत असाच प्रकार केला. तसेच पीडित तरुणाकडूल पैसे आणि आयफोन हिसकावून घेतल्याची माहिती समोर आली आहे.

याप्रकणी पोलिसांकडून सखोल तपास केला जात आहे. पोलिसांना आरोपी हे मनोरुग्ण वाटत आहेत. त्या दृष्टीकोनाने तपास केला जाणार आहे. या प्रकरणी तपासासाठी एका स्पेशल टीम गठीत करण्यात आली आहे. ही टीम या प्रकरणी सखोल तपास करत आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठातर्फे अकोला येथे तीन दिवसीय शिवार फेरीचे आयोजन

## शिवार फेरीचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा- कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणाचे शेतकऱ्यांना आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

विद्यापीठ स्थापना दिनाचे औचित्य साधून यावर्षी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांची शिवार फेरी दि. २० सप्टेंबर ते २२ सप्टेंबर, २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आली असून या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. २० सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ वा. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभ हस्ते होणार आहे. या शिवार फेरीचे म्हणजे थेट प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शेतकरी, संशोधक, धोरणकर्ते व उद्योगधंदे भागधारक आदींना कृषी तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण करण्यासाठी, अत्याधुनिक कृषी पद्धतीबद्दल जाणून घेण्यासाठी व शाश्वत आणि पर्यावरणास अनुकूल पद्धतीची खात्री करून पीक उत्पादकता वाढवण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे असे असून या तीन दिवसीय शिवार फ `रीमध्ये वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा समावेश आहे. त्यानुसार-३०० खरीप पिक उत्पादन तंत्रांचे २५ एकर क्षेत्रावर एकाच ठिकाणी प्रात्यक्षिके ( तृणधान्य,कडधान्य, नगदी पिके, तेलबिया, भाजीपाला, फळपिके, चारा पिके) -विविध खाजगी कृषि निविष्ठा कंपन्यांची थेट प्रात्यक्षिके, या तीन दिवसांमध्ये राज्यातील एकूण १ लाख शेतकरी शिवार फेरी मध्ये सहभागी होतील असे अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या विविध संशोधन विभागाचे ११०० हेक्टर क्षेत्र शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक म्हणून पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. आपल्या प्रदेशातील कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने व संधी यावर चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे. भव्य स्वरुपात कृषी उत्पादन तंत्रज्ञानाचे थेट प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिके पाहण्याची आणि कृषी शास्त्रज्ञांशी चर्चा करण्याची संधी शेतकऱ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी दिलेली आहे. या शिवार फेरीच्या कार्यक्रमात शेतकऱ्यांची एकाच वेळी गर्दी होऊ नये म्हणून बुलढाणा जिल्ह्यासाठी नियोजित असलेल्या दिवशी म्हणजेच दि. २० सप्टेंबरला बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने याशिवार फेरीचा लाभ घ्यावा,फ़ असे आवाहन कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ.अमोल एस. झापे यांनी केले.

# शिक्षक पात्रता परीक्षा २३ नोव्हेंबरला होणार

## ऑनलाईन अर्ज करण्यासाठी ३ ऑक्टोबरपर्यंत मुदत

जनसंचलन/बुलढाणा

शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता (टीईटी) २०२५ परीक्षेचे आयोजन रविवार, दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली. इयत्ता १ ली ते ५ वी (पेपर १) व इयत्ता ६ वी ते ८ वी (पेपर २) साठी सर्व व्यवस्थापन, सर्व परीक्षा मंडळे, सर्व माध्यम अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित इत्यादी शाळांमध्ये शिक्षण सेवक, शिक्षक पदावर नियुक्तीसाठी उमदवारांना प्रथमत: ही परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. या परीक्षेशी संबंधित सर्व शासन निण, अनुषंगिक माहिती, सूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या ://. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ऑनलाईन अर्ज भरणे, परीक्षा शुल्क भरणे, परीक्षेची वेळ व इतर सविस्तर माहितीचा तपशील परिषदेच्या उपरोक्त संकेतस्थळावर देण्यात आलेला आहे. सर्व संबंधित परीक्षार्थ्यांनी या संकेतस्थळास नियमित भेट द्यावी. या परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची प्रक्रिया सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०२५ पासून सुरु झाली आहे. परिक्षार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने परीक्षेचे आवेनपत्र शुक्रवार, दि. ३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत भरता येतील. ऑनलाईन आवेदनपत्र व परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दि. १५ सप्टेंबर २०२५ ते ०३ ऑक्टोबर २०२५ असा आहे. प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढुन घेण्याचा कालावधी दि. १० नोव्हेंबर २०२५ ते २३ नोव्हेंबर २०२५ असा आहे. शिक्षक पात्रता परीक्षा पेपर १ रविवार, दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत राहील तसेच शिक्षण पात्रता परीक्षा पेपर २ रविवार, दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० ते दुपारी ५ वाजेपर्यंत राहील. काही प्रशासकीय अडचणीमुळे या वेळापत्रकामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिक्षार्थ्यांसाठी अद्यावत माहिती परिषदेच्या ://. या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द केली जाईल, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी कळविले आहे.

# तरुणांना कौशल्य स्पर्धेकरिता संधी ; ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणीचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

जगातील सर्वात मोठी व्यवसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा दर दोन वर्षांनी घेण्यात येत असून ही जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२६ मध्ये शांघाई, चीन येथे आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत २३ वर्षाखालील तरुणांना आपली कौशल्ये सादर करण्याची संधी असून तरुणांनी ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणी करुन या स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्किल कॉन्सील तसेच विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने ६३ विविध क्षेत्रांमध्ये जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर स्किल कॉम्पीटीशनचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धामधून निवड झालेल्या उमेदवारांची नावे देशपातळीवरून जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत. या स्पर्धेत सहभागासाठी वयोमर्यादा हा एकमेव निकष असून ५० क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा नंतरचा असणे आवश्यक आहे. तर १३ विशेष क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा नंतरचा असणे गरजेचे आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी ://... या संकेतस्थळावर भेट देऊन ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त गणेश बिटोडे यांनी केले आहे.

# बुलढाणा तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा




जनसंचलन/बुलढाणा

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकालात काढणे करीता छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनी बुधवार, दि. १७ सप्टेंबर २०२५ ते महात्मा गांधी यांच्या जन्मदिनी गुरुवार, दि. २ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीमध्ये महसूल सेवा पंधरवडा राबविण्यात येणार आहे. या सेवा पंधरवडामध्ये तीन टप्प्यामध्ये उपक्रम आयोजित केले आहेत. टप्पा क्रमांक एक मध्ये पाणंद रस्ते मोहिम १७ सप्टेंबर २०२५ ते २२ सप्टेंबर २०२५ शेतरस्ता, शिवार रस्ता, पाणंद रस्ते खुले करणे तसेच टप्पा क्रमांक दोन मध्ये सर्वांसाठी घरे अभियान दि. २३ सप्टेंबर २०२५ ते २७ सप्टेंबर २०२५ व टप्पा क्रमांक तीन मध्ये नाविण्यपूर्ण उपक्रम मोहीम दि. २८ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोंबर २०२५ मध्ये आदिसेतू, जनसंवाद विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या आदिसेतू उपक्रमाच्या धरतीवर जिल्ह्यात दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी आदिसेतू उपक्रम राबविण्यात येणार आहे. तसेच जनसंवाद अभियानांतर्गत आदर्श गब्राम दत्तक योजना कधील पालकत्व घेतलेल्या अधिकाऱ्यांनी दत्तक गावास भेटी देवून सोबत फॉर्म भरुन घेण्यात येणार आहेत. बुलढाणा तालुक्यामध्ये पाडळी मंडळ येथील मौजे गुम्मी या गावामध्ये बुलढाणा मंडळातील मौजे येळबगाव, साखळी बु. मंडळातील मौजे कोलवड व म्हसला बु. मंडळातील मौजे म्हसला बु. गावांमध्ये दि. १९ सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच मंडळ देऊळघाट मंडळातील मौजे देऊळघाट, मंडळ रायपूर येथील मौजे रायपूर व मंडळ धाड मधील सावळी गावांमध्ये दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येणार आहे. दि. १९ सप्टेंबर व दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी घेण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत देणाऱ्या सेवांचा लाभ जास्तीत-जास्त जनतेने घ्यावा, असे आवाहन बुलढाणा तहसिलदार यांनी केल आह

# मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टल सुरु

## प्रकल्प अधिकारी मोहनकुमार व्यवहारे यांची माहिती

## महाविद्यालय आणि विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अकोला कार्यालयाच्या अधिनस्त अकोला, वाशीम व बुलढाणा या तीन जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित, कायम विना अनुदानित सर्व मान्यता प्राप्त महाविद्यालयांना आणि सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रातील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व अन्य शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेणेसाठी ऑनलाईन महाडीबीटी प्रणालीवर नवीन अर्ज व नुतनीकरणाचक अर्ज भरण्यासाठी संकेतस्थसळ कार्यान्वित करण्यात आलेला आहे. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शिष्यवृत्ती योजनांची अर्ज महाडीबीटी पोर्टलवरील या संकेतस्थळावर विहीत मुदतीत भरण्याबाबत कळविण्यात आले आहे. ११ वी, १२ वी, बी.ए., बीकॉम, बीएससी, एमए, एमकॉम, एमएससी, बीएसडब्लू, एमएसडब्लू, बीलीब, एमलीब, एएनएम, जीएनएम, डीएड, बीएड, एमएड या विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमास प्रवेशित असलेले विद्यार्थी तसेच शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी विभाग, पशुधन, दुग्धव्यवसाय आणि मत्सयव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखालील मान्यता प्राप्त अभ्यासक्रमास प्रवेशित असलेले अनुसूचित जमातीचे विद्यार्थी या योजनेचा लाभ घेवू शकतात. विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्यासाठी बोनाफाईड प्रमाणपत्र, जातीचा दाखला, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र, टी.सी., शैक्षणिक मार्कशीट आणि आवश्यक त्या अभ्यासक्रमासाठी जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत. विद्यार्थ्यांनी या योजनेची कार्यप्रणाली व सर्व माहितीसाठी आदिवासी विकास विभागाच्या दि. १७ जानेवारी २०२२ चे अवलोकन करावे. योजनेबाबत वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचना व कालमर्यादा सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील. तेव्हा अनुसूचित जमातीच्या सर्व मॅट्रिकोत्तर विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी मोहनकुमार व्यवहारे यांनी केले आहे.

# जिल्हा रुग्णालयातील पाणी व स्वच्छतेच्या मागण्या पूर्ण !

**जनसंचलन/ बुलढाणा**

-क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पाठपुराव्याला यश! बुलडाणा ( हॅलो बुलढाणा ) जिल्हा रुग्णालयातील पिण्याचे शुद्ध पाणी आणि स्वच्छतेचा गंभीर प्रश्न संदर्भात क्रांतिकारी शेतकरी संघटनेने जिल्हा शल्य चिकित्सकांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. या मागण्यांची गंभीर दखल घेत जिल्हा प्रशासनाने त्वरित कार्यवाही केली आहे. रुग्णालय परिसरात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर रुग्णालयातील व परिसरातील स्वच्छता व्यवस्थेतही लक्षणीय सुधारणा करण्यात आली आहे. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला असून, आरोग्यसेवेत सुधारणा झाल्याबद्दल क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हा शल्य चिकित्सक व प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. दरम्यान जनतेच्या आरोग्याच्या हक्कासाठी आम्ही नेहमी लढत राहू. प्रशासनाने जनतेच्या समस्यांची दखल घेऊन त्वरित निराकरण केले ही सकारात्मक बाब आहे , असे क्रांतिकारी शेतकरी संघटनाचेअमोल मोरे यांनीम्हटलेआहे.

# शिवसाई युनिव्हर्सल स्कूल येथे संपन्न झाला गुणवंत खेळाडू व प्रशिक्षकांचा सत्कार समारंभ

**जनसंचलन/बुलढाणा**

शनिवार दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी शिवसाई युनिव्हर्सल ज्ञानपीठ बुलढाणा येथे पार पडला आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार. आपला जिल्हा व महाराष्ट्रासाठी तसेच आपल्या देशासाठी अभिमानाची गोष्ट म्हणजे नुकतेच संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय वर्ल्ड युथ आर्चरी स्पर्धा कॅनडा या ठिकाणी संपन्न झाल्या यात भारतीय संघामध्ये आमच्या महाविद्यालयाचा मिहीर नितीन अपार हा खेळाडू सहभागी झाला होता या स्पर्धेत भारतीय संघाने उत्कृष्ट खेळी करून आपल्या देशाला सुवर्णपदक प्राप्त करून दिले याच अनुषंगाने शिवसाई युनिव्हर्सल ज्ञानपीठ स्कूलमध्ये मिहिर अपार व त्यांचे प्रशिक्षक चंद्रकांत इलग सर यांचे व सोबतच आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक विजेता खेळाडू मानव गणेश जाधव याचा देखील याप्रसंगी सत्कार करण्यात आला मिहिर व मानवचे शिवसाई युनिव्हर्सल स्कूल मध्ये ढोल ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले मिहीर व मानव यांच्या स्वागतासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले माननीय जिल्हा क्रीडा क्रीडा अधिकारी महानकर साहेब माननीय प्राध्यापक मनोज व्यवहारे सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ.योगेश शेवाळे माननीय ॲडव्होकेट उदय कारंजकर साहेब यांचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती शिवसाई युनिव्हर्सल चे संचालक माननीय डी. एस. लहाने सर यांनी खेळाडू व प्रशिक्षकांचे भव्य असे स्वागत केले व आपल्या मनोगत व्यक्त करतांना आपण मिहिर व मानव चा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपला छंद जोपासावा तसेच क्रीडा क्षेत्रात आपल्या शाळेचे व देशाचे नावलौकिक




वाढवावे असे प्रतिपादन केले. तसेच वर्ग ९ वी च्या वर्ग शिक्षक गोपाल आडवे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मुलाखतीमध्ये मीहीरने आपल्या त्याचा संपूर्ण प्रवास कसा झाला याचा थोडक्यात मुलांना आढावा दिला तर मानव जाधव देखील आपला विचार प्रगट करताना मानव पाच वेळा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कसा खेळला व वर्ल्ड रेकॉर्ड त्याच्या नावावर कसे केले याची माहिती दिली प्रशिक्षकांनी देखील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले सर्व मान्यवरांनी देखील आपला मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्याप्रसंगी कार्यक्रमासाठी शाळेचे प्राचार्य प्रमोद मोहरकर व क्रीडा शिक्षक या सागर उबाळे आणि शाळेचा संपूर्ण टीचिंग स्टाफ आणि नॉन टीचिंग स्टाफ उपस्थित होता.

# शेगाव बाजार समितीस तृतीय क्रमांकाचा पुरस्कार

**जनसंचलन/ शेगाव**

महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ पुणे यांच्यावतीने देण्यात येणाऱ्या कै. वसंतराव दादा पाटील स्मृती पुरस्कारासाठी यंदा बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची निवड करण्यात आली. अमरावती विभागात तिसरा क्रमांक प्राप्त झाला आहे. पुणे येथील विणकर सभागृहात १६ सप्टेंबर रोजी आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभेत हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नहाटा, उपसभापती सोमनाथ सूर्यवंशी आणि संघाचे पदाधिकारी यांच्या हस्ते हा सन्मान शेगाव बाजार समितीच्या प्रतिनिधींना देण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना सहकार नेते पांडुरंगदादा पाटील, सभापती गोपाळराव मिरगे आणि सचिव विलास पुंडकर उपस्थित होते. शेतकऱ्यांना योग्य भाव मिळवून देणे, त्यांच्या मालाची खरेदी-विक्री सुलभ करणे तसेच अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शेगाव बाजार समितीने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन हा पुरस्कार मिळाला आहे. यामुळे समितीच्या कार्याला नवी ऊर्जा मिळाली असून, शेतकऱ्यांच्या हितासाठी यापुढेही तत्पर राहण्याचे पांडुरंगदादा पाटील यांनी आश्वासन दिले.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८